दै. पुण्य नगरी दि. ०९/१२/२०१९

दै. पुण्य नगरी दि. ०९/१२/२०१९

# दिलीपसिंग कॉलनी गोळीबारातील म्होरक्या गजाआड

नांदेड / प्रतिनिधी

शहरातील दिलीपसिंघ कॉलनी भागात ६ सप्टेंबर रोजी मध्यरात्री झालेल्या गोळीबार प्रकरणाचा सूत्रधार व मोक्का गुन्ह्यातील म्होरक्या कमल यादव याला अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. त्यामुळे या प्रकरणात अटक झालेल्या आरोपींची संख्या पाच झाली आहे.

वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दिलीपसिंघ कॉलनी भागात ६ सप्टेंबर १९ रोजी मध्यरात्री १२.३० च्या सुमारास आपसातील भांडणातून गोळीबार झाल्याची घटना घडली होती. याबाबत माहिती मिळताच वजिराबाद पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन दोघांना अटक केली होती. त्यात प्रदीप राऊत्रे व अन्वर शेख अकबर खान यांचा समावेश होता. या घटनेतील अन्य काही जण फरार झाले होते. या प्रकरणी संतोष बेलुरोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वजिराबाद ठाण्यात पिस्टलमधून गोळीबार करणारा व त्याचा साथीदाराला काडतुसासह ताब्यात घेतले होते. वजिराबाद ठाण्यात गुरनं २७६/१९ कलम ३०७, ३४ सह कलम ३/२५ व २७ भारतीय हत्यार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील बडे यांनी केला. ज्यात आरोपीतांनी कट रचणे, फायर करण्यास प्रोत्साहीत करणे अशा कलमांची वाढ करुन इतर आरोपी निष्पन्न केले. एकूण पाच जणांचा यात समावेश करण्यात आला आहे. या टोळीचा मटक्याचा अवैध व्यवसाय जिल्ह्यात सुरळीत चालावा व दुसऱ्या कोणत्या टोळ्या निर्माण होऊ नयेत म्हणून शहरात दहशत निर्माण करण्यासाठी व शहरातील वादग्रस्त जमीनीवर कब्जा करण्याच्या हेतूने ही टोळी कार्यरत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यातूनच हा गोळीबार घडवून आणल्याची माहिती तपासात समोर आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक संदीप शिवले यांनी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमाचे कलम समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक विजयकुमार मगर यांच्या मार्फत पाठविला होता. विशेष पोलीस महानिरीक्षकांनी परवानगी दिल्याने या टोळीविरुध्द मोक्का कलम ३(१), ३(२), ३(४) १९९९ प्रमाणे समाविष्ट करुन तपास शहर उपविभागीय पोलीस अधिकारी अभिजित फस्के यांच्याकडे दिला होता. फस्के यांनी या प्रकरणात चार आरोपींना पकडून औरंगाबादच्या मध्यवर्ती कारागृहात धाडले. हे चारही जण अजूनही कारागृहातच बंदिस्त आहेत.

या टोळीचा म्होरक्या कमल यादव हा घटनेपासून फरार होता. त्याने वारंवार आपले ठिकाणही बदलले. परंतु पोलीस अधीक्षक विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक दत्ताराम राठोड यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी डोईफोडे यांना दिलेल्या सूचनेप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील नाईक, उपनिरीक्षक प्रवीण राठोड, पोकॉ राजू पुल्लेवार, पोकॉ बोडके, पोकॉ रवीकुमार बाबर, पोकॉ मोतीराम पवार, पोकॉ तेलंग यांनी सूत्रधार कमल यादव याला पकडण्यात यश मिळविले.